जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१९/०१/२०२५
## दि.१८/०१/२०२५ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८७/२०२५,भा.न्या.सं.कलम ३१८(४),३१९(२),३(५) आयटीॲक्ट ६६ (डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४३ वर्षे,रा.हडपसर पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०५/२०२४ ते दिनांक ०३/०८/२०२४ रोजी दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक ॲडमीन याने स्वताचे अधिक फायदयासाठी एका इन्वेस्टमेन्ट कंपनी मार्फत इनव्हेस्ट करण्यास सांगुन एका लिंक मध्ये अकाउंट तयार करण्यास सांगुन त्यामध्ये शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीवर झालेले प्रॉफिटपैकी ५०,०००/- रू. रक्कम देवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांनी दिलेल्या बँक खात्यावर **१५,८६,५९८/-** रु ट्रान्सफर करण्यास सांगुन नंतर कोणताही परतावा न देता फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री.निलेश जगदाळे मो.नं.९०४९९८१२२१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बाणेर पो स्टे ४१/२०२५,भा.न्या.सं.कलम ३१८(४),३१९(२)आयटीॲक्ट ६६(सी) (डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ६५ वर्षे, रा.पाषाण,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. २४/१२/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक यांनी फोन करून एमएनजीएल गॅसचे बील अपडेट झाले नसल्याने गॅस कनेक्शन बंद करण्यात येईल याबाबतचा कॉल आल्याने त्या कॉलवर चर्चा करून एपीके फाईल डाऊनलोड करण्यास सांगुन त्यामध्ये माहिती भरण्यास सांगुन फिर्यादीचा मोबाईलचा ॲक्सेस प्राप्त करून घेवुन फिर्यादी यांचे बँक खाते मधुन ३,४६,९००/-रू.काढून फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.नवनाथ जगताप मो.नं.९९२३३४६८१० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ०९/२०२५, भा.न्या.सं.कलम ३०९(४),३०९(६),३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २९ वर्षे, रा.सुस गाव,पाषाण लिंक रोड,पुणे |
| **आरोपीत** | एक रिक्षा चालक व त्यांचा मित्र(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०१/२०२५ रोजी स.०५/२५ वा.चे.सुमा.मंगला टॉकिजच्या समोरली ब्रिजवर,बसस्टॉप, शिवाजीनगर,पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचा मेव्हणा असे नमुद ठिकाणी बसची वाट पाहत थांबले असताना नमुद दोन अनोळखी इसम हे रिक्षा मध्ये येवून फिर्यादीना मारहाण करुन फिर्यादीच्या खिश्यातून २००/-रू.व फोन पे व्दारे १,०००/-रू.असे १२००/-रू.जबरदस्तीने काढून घेऊन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.पाटील मो.नं.९३०७२३१४२१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८४/२०२५,भा.न्या.सं.कलम ३०५,३३१ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३१ वर्षे, रा.घावटेनगर,मांजरी बुा,पुणे. |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०१/२०२५ रोजी दु.१२/३० ते १५/०० वा.चे दरम्यान,नक्षत्र पार्क,घावटेनगर, मांजरी बुा,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील १,९०,०००/- रू कि.चे सोन्याचे दागिने,तसेच दुसरे साक्षीदार यांचे घरातुन २,९३,०००/-रू.कि.चे सोन्याचे दागिणे असा एकूण ४,८३,०००/-रू.कि.चा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अनिल बिनवडे मो.नं.९१५८८८८१०० |

## प्रेस नोट दि.१९/०१/२०२५

## <u>दि.१९/०१/२०२५ रोजी रात्रौ ००/०० वा.ते १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१.

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १०/२०२५,भा.न्या.सं.कलम,१०९,११८(१),११७(२),११५(२),३५१(२),३५२,३(५)महा. पो.का.क.३७(१)(३)सह१३५, आर्म ॲक्ट ४(२५), क्रि.लॉ.अमेडमेंट कायदा कलम ७ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५८ वर्षे,रा.भवानी पेठ,पुणे |
| **आरोपीत** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०१/२०२५ रोजी २१/०५ वा.आदमाने बिल्डींग खाली, भवानी पेठ,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्याचा मुलगा नमुद ठिकाणी बकरे बघण्यासाठी आले असताना फिर्यादी यांच्या जुन्या प्रॉपटीच्या वादावरुन नमुद इसम यांनी संगनमत व दहशत निर्माण करुन त्यांचे कडील असलेले लोखंडी हत्यारांने फिर्यादी यांचा मुलगा यास जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याचे डोक्यात वार करुन गंभीर जखमी करून,फिर्यादी यांना डोक्यात मारून जखमी केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.दादासाहेब पाटील मो.नं.८६९८६४७६५४. |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**